# उसावरील खोडकिडीची ओळख आणि व्यवस्थापन

**डॉ. भैय्यासाहेब गायकवाड**
विषय विशेषज्ञ (किटकशास्त्रज्ञ)

**डॉ. हनुमान गरुड**
विषय विशेषज्ञ (कृषिविद्या)

**प्रा. किशोर जगताप**
प्र. कार्यक्रम समन्वयक

कृषि विज्ञान केंद्र, खामगाव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

उसावर ५ प्रकारच्या खोड किडी येतात. त्यावर खोड किडा, शेंडा खोड किडा, दोन कांड्यामधील खोड किडा व मुळाजवळील खोडावर येणारा खोड किडा व हुमणी ह्या आहेत. खोड किडा ही उसाचे उगवणीनंतर मोठ्या बांधणीपर्यंत या किडीचा प्रादुर्भाव दिसून येतो. खोडकिडीचा प्रादुर्भाव उगवणीनंतर झाल्यास ऊस मरतो. वाळलेल्या पोंग्यावरून ही कीड ताबडतोब ओळखता येते.

### ओळख:

या किडीचा पतंग वैरणीच्या रंगाचा असतो. मादी पतंग पानाच्या खालील बाजूस पुंजक्यात अंडी घालते. अंडी लांब गोलाकार सपाट व एका रेषेत घालत असून त्यांचा रंग पांढरा असतो. मादी पतंग ३०० ते ४० अंडी घालते. अंडी उबविण्यासाठी ३ ते ६ दिवसांचा कालावधी लागतो. अंड्यातून बाहेर आलेल्या आळीचा रंग पिवळसर पांढरा असतो व तिच्या अंगावर जांभळ्या रंगाचे पाच पट्टे असतात. अळी अवस्था नुकसान करणारी असून तिचा कालावधी २२ ते ३१ दिवसांचा असतो. कोषाचा रंग पिवळसर तपकिरी असून कोषाचा कालावधी ५ ते ९ दिवसांचा असतो. कोष जमिनीलगत पोंग्यात असतो. पतंगाचा कालावधी ४ ते ५ दिवस असतो. खोडकिडीचा जीवनक्रम पूर्ण होण्यासाठी ३५ ते ५१ दिवस लागतात.

### नुकसानीचा प्रकार:

अंड्यातून बाहेर पडलेली अळी १७ ते १८ तास पानावर फिरते. नंतर ती उसाच्या सुरळीतून अगर जमिनीलगत असलेल्या खोडात शिरते आणि आतील भागावर उपजिवीका करते. त्यामुळे उसाचे पोंगे वाळतात व मूळ ऊस मरतो. त्याबरोबरच उसाला फुटवे फुटतात. फुटव्यावरसुद्धा ही अळी उपजिवीका करते. खोडकिडीमुळे ऊस उत्पादनात २२ ते ३३ %, साखर उताऱ्यात १२ % व गुळाच्या उत्पादनात २७ % घट येते.

### व्यवस्थापनाचे उपाय:

#### मशागतीय पध्दती:

- जमिनीची खोल नांगरट करावी.
- लागवड पट्टा अथवा रुंद सरी पध्दतीने करावी. त्यामुळे किडनाशकांची फवारणी किंवा धुरळणी करणे सोयीचे होईल. कीडग्रस्त बेणे वापरु नये. निरोगी बेण्याची लागवड करावी. ऊस लागवड फेब्रुवारी नंतर करू नये.
- कांदा, लसूण, कोथींबीर व पालक ही आंतरपिके घ्यावीत, त्यामुळे मित्र किटकांचे संवर्धन होईल. ज्वारी, गहु व मका इत्यादी पिके घेऊ नयेत, कारण या पिकावरील खोडकिडींचा प्रादुर्भाव ऊसावर होणार नाही.
- ऊसात पाणी साचत असल्यास चर काढून पाण्याचा निचरा करावा. पाण्याचा जास्त ताण पडल्यास पाणी द्यावे.
- नत्रयुक्त खतांचा जास्त वापर करु नये.
- ऊस उगवणीनंतर ऊस ४५ दिवसांचा झाल्यावर बाळबांधणी करावी म्हणजे खोडकिडीने निर्माण केलेली छिद्रे बंध होतील व पतंग बाहेर पडण्याचा मार्ग बंद होईल. खोडकिडीची अंडी व किडग्रस्त भाग अळ्यासह गोळा करून नष्ट करावा.
- खोडकिडीची अळ्या ऊस तोडणीनंतर खोडक्यात राहतात, म्हणून ऊस तोडणी नंतर लगेच नांगरणी करावी व अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात.
- ऊस उगवणीनंतर पाचटाचे ५ टन प्रती हेक्टरी आच्छादन करावे म्हणजे खोडकिडीचया अळ्यांना खोडामध्ये जाताना अडथळा होईल.
- २५ कामगंध (फेरोमोन) सापळे प्रती हेक्टरी लावावेत.

#### यांत्रिक पध्दती:

खोडकिडाग्रस्त ऊसाचे पोंगे/ शेंडे काढून अळीसह नष्ट करावेत. किडींची अंडी / अंडीपुंज असलेली पाने गोळा करुन जाळून टाकावीत किंवा जमिनीत पुरावीत. पिवळ्या चिकट सापळयाचा वापर करावा.

#### जैविक पध्दती:

- मित्र कीटक जसे क्रायसोपर्ला कार्नियां, ईपीरीकॅनीया मेलॅनोल्युका, डिफा ऑफिडीव्होरा (कोनोबाथ्रा), ट्रायकोग्रामा यांचे संवर्धन करावे.
- खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास अंड्यावरील परोपजीवी कीटक ट्रायकोग्राम चिलोनीस हेक्टरी ५० हजार प्रमाणे दर १० दिवसाच्या अंतराने ४ ते ६ वेळा सोडावेत.

#### रासायनिक पध्दती:

- आर्थिक नुकसानीची पातळी १५ टक्के गाभेमर आहे. गरजेनुसार कीटकनाशकांची फवारणी करावी.
- जमिनीत ओल असल्यास क्लोरॅनट्रानिलिप्रोल ०.४ जीआर १८.७५ किलो किंवा फ़िप्रोनिल ०.३ जीआर २५-३३ किलो हे दाणेदार कीटकनाशके प्रति हेक्टरी वापरावे. किंवा थायामिथॉक्झाम ७५ एसजी २ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळुन खोडाभोवती आळवणी करावी. किंवा क्लोरॅनट्रानिलिप्रोल १८.५ एससी ३.७५ मिली किंवा फ़िप्रोनील ५ एससी ३० मिली किंवा क्लोरपायरिफॉस २० ईसी १५-२५ मिली १० लिटर पाण्यात मिसळुन फ़वारावे.

(संपर्क: +९१ ९४२०४५९८०८)

★ ★ ★